# जनसंपर्क अधिकारी
## पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगांव

फोन ०२५७-२२२३७१० फॅक्स ०२५७-२२२०५२२
Email ID:-sp.jalgaon@mahapolice.gov.in

प्रेस नोट क्र- ११९ दिनांक :- ०२/०९/२०२६

**" रावेर पोलीस ठाणे हद्दीतील संघटित गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी कठोर कारवाई ; दहा आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम १११ "संघटित गुन्हा (Organised Crime)" अन्वये वाढीव कलम लावण्यास पोलीस अधीक्षकांची मंजुरी**

रावेर पोलीस ठाणे (जि. जळगाव) येथे गुन्हा रजि. नं. ४०१/२०२६, भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ११८(२), १९०, १८९(२)(४), १९१(३), ३५२, ३५१(२)(३), ३२४(४) अन्वये दिनांक २२/०८/२०२६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

**सदर गुन्ह्यात आरोपी १) जयेश मोतीलाल शिंदे, २) हरीश पवन शिंदे, ३) मेहुन संजय शिंदे, ४) केदार सुनील शिंदे, ५) मयुर गोपाळ महाजन, ६) धनराज कांतिलाल महाजन, ७) कांतिलाल शामराव महाजन, ८) पवन मधुकर शिंदे, ९) भूषण मोतीलाल शिंदे, १०) जयेश चंपालाल मोपारी, सर्व रा. शिवाजी चौक, रावेर, ता. रावेर, जि. जळगाव, यांचा समावेश आहे.**

सदर आरोपींच्या गुन्हेगारी पार्श्वभूमीची चौकशी केली असता, आरोपी क्र. १) **जयेश मोतीलाल शिंदे** याच्याविरुद्ध एकूण **०५ गुन्हे**, आरोपी क्र. २) **हरीश पवन शिंदे** याच्याविरुद्ध **०२ गुन्हे**, आरोपी क्र. ३) **मेहुन संजय शिंदे** याच्याविरुद्ध **०१ गुन्हा**, आरोपी क्र. ४) **केदार सुनील शिंदे** याच्याविरुद्ध **०१ गुन्हा**, आरोपी क्र. ५) **मयुर गोपाळ महाजन** याच्याविरुद्ध **०१ गुन्हा**, आरोपी क्र. ६ **धनराज कांतिलाल महाजन** याच्याविरुद्ध **०१ गुन्हा**, आरोपी क्र. ७) **कांतिलाल शामराव महाजन** याच्याविरुद्ध **०३ गुन्हे**, आरोपी क्र. ८) **पवन मधुकर शिंदे** याच्याविरुद्ध **०५ गुन्हे**, आरोपी क्र. ९) **भूषण मोतीलाल शिंदे** याच्याविरुद्ध **०२ गुन्हे**, तर आरोपी क्र. १०) **जयेश चंपालाल मोपारी** यांच्याविरुद्ध **०१ गुन्हा** दाखल असल्याचे रावेर पोलीस ठाण्याच्या अभिलेखावरून निदर्शनास आले आहे.

सदर आरोपी हे **संघटितपणे टोळी तयार करून गुन्हे करत असल्याचे** तसेच एकत्रितपणे येऊन गुन्हेगारी कृत्यांमध्ये सहभागी होत असल्याचे पोलीस अभिलेखावरून दिसून येत आहे. त्यामुळे त्यांच्या गुन्हेगारी कारवायांना प्रतिबंध घालणे व परिसरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे आवश्यक असल्याने, सदर गुन्ह्यात **भारतीय न्याय संहिता, २०२३ मधील कलम १११ "संघटित गुन्हा (Organised Crime)" अन्वये वाढीव** कलम लागू करण्याबाबतची कार्यवाही करण्यात आली.


SMART POLICING PRINCIPLES


SMART POLICING PRINCIPLES
Hero